स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 12–01–2016** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 12. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 13. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 14. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 15. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 16. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. सौ. रंजना लाडे, उपायुक्त (1)
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 444ः– प्रभाग क्र. 72 क अंतर्गत विजय विहार येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 29,82,401/– रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 445</u>:— प्रभाग क्र. 66 (ब) अंतर्गत द्वारकापूरी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 49,98,315/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 446</u>:— प्रभाग क्र. 72 अ अंतर्गत एच.बी.इस्टेट ते खामला मटन मार्केट येथील विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 41,04,228/— (अक्षरी एकेचाळीस लक्ष चार हजार दोनशे अठ्ठावीस रुपये फक्त) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 447</u>:— प्रभाग क्र. 72 क अंतर्गत पारधी ले—आऊट व मालडोंगरी ले—आऊट, जयताळा येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 29,94,167/— (अक्षरी एकोणतीस लक्ष चौऱ्यानऊ हजार एकशे सदुसठ रुपये फक्त) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 448</u>:— प्रभाग क्र. 32—अ व ब, लकडगंज क्वेटा कॉलोनी, सतनामी नगर व भाऊराव नगर येथे रस्त्याचे पुनःडांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. डी.सी.गुरुबक्षाणी यांची प्राकलनीय दरापेक्षा 2.00 टक्के अधिक दराची रु. 29,99,515/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 449</u>:— प्रभाग क्र. 25—ब येथील टिळकनगर मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तवरु. 29,99,900/— (अक्षरी एकोणतीस लक्ष नव्यांनऊ हजार नऊशे फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 450</u>:— प्रभाग क्र. 65 (अ) व (ब) अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण 6 निविदाकारा पैकी मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा 0.95 टक्के अधिक दराच्या निविदा राशी रू. 30,28,402/— रकमेच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 451</u>:– प्रभाग क्र. 7 ब येथील आदिवासी सोसायटी, जय दुर्गा ले–आऊट, कडु ले–आऊट, मलवार ले–आऊट आणि झिंगाबाई टाकळी येथे विविध ठिकाणी रोडचे डांबरीकरण करणे, रु. 24,93,445/– (अक्षरी चोविस लक्ष त्र्यांनऊ हजार चारशे पंचेचाळीस रुपये फक्त) प्राकलनास जुने पद क्र. 680 व नवीन पद क्र. A42001374612 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन रु. 24,93,445/– या ऐवजी 29,93,445/– ही दुरुस्ती करण्यांत यावी या प्रशासनाने केलेल्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 452</u>:– प्रभाग क्र. 15 अ अंतर्गत विनोबा भावे नगर, संजयबाग कॉलोनी, नागसेनवन नगर येथील श्री. इरशाद मोहम्मद अब्दुल मस्जिद अजिज खान यांच्या घराजवळ रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 49,99,620/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 453</u>:– प्रभाग क्र. 56 अ अंतर्गत सावरकर नगर, विवेकानंद नगर, रामकृष्णनगर, विकास नगर येथील विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 30,34,172/– (अक्षरी तीस लक्ष चौतीस हजार एकशे बहात्तर रुपये फक्त) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 454</u>:– प्रभाग क्र. 55 अ अंतर्गत प्रतापनगर, कोतवालनगर, अत्रे ले–आऊट, उर्वेला कॉलोनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 29,99,980/– (अक्षरी एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार नऊशे अंशी रुपये फक्त) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 455</u>:– प्रभाग क्र. 22 अ येथील गिट्टीखदान व सदर भागामध्ये सिमेंट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 27,33,748/– (अक्षरी सत्तावीस लक्ष तेहतीस हजार तीनशे सातशे अठ्ठेचाळीस रुपये फक्त) प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 456</u>:— प्रभाग क्र. 26 येथील छोटी धंतोली व मेहाडीया
चौक ते मुंजे चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 29,99,250/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 457</u>:— प्रभाग क्र. 72 ब अंतर्गत इंद्रप्रस्थनगर येथील मुख्य
ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 29,95,393/— (अक्षरी एकोणतीस लक्ष पंच्यानऊ हजार तीनशे त्र्यानव रुपये फक्त) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 458</u>:— प्रभाग क्र. 36—ब, देशपांडे ले—आऊट व वर्धमाननगर
येथील रस्ते डांबरीकरणा करीता प्राप्त निम्नतम निविदाकार मे. फोनिक्स इंजिनिअरींग यांची 4.69 टक्के अधिक दराची रु. 62,54,895/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न तसेच,

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A2001330802 मधून आर्थिक वर्ष 2015—2016 मध्ये रु. 62,55,000/— (अक्षरी बासष्ट लक्ष पंचावन हजार फक्त) राशीची तरतूद उपलब्ध दिलेली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 459</u>:— प्रभाग क्र. 70 ब अंतर्गत संभाजीनगर, बंडु सोनी
ले—आऊट, सुभाषनगर, लोखंडे नगर, गजानन नगर, नेल्को सोसा. सरस्वती विहार व इतर ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 47,53,270/— (अक्षरी सत्तेचाळीस लक्ष त्रेपन हजार दोनशे सत्तर रुपये फक्त) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 460</u>:— नागपूर शहरातील हुडकेश्वर—नरसाळा येथे
पायाभूत सोयी सुविधा निर्मिती अंतर्गत पाणी पुरवठा योजनेकरिता राज्यशासनाने महानगरपालिकेस दिलेल्या अर्थसहाय्य प्रकल्प राबविण्याकरिता व मनपा सीमेअंतर्गत 3 उंचीवरील व 1 जमिनीवरील जलकुंभ बांधण्याच्या कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराची नियुक्ती करण्यास्तव मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये निम्नतम निविदाकार M/s. DRA

Consultant Pvt. Ltd. Nagpur यांची प्रकल्पीय राशीवर 3 टक्के दराने निविदा म्हणजेच रु. 206.91 लक्ष व त्यावर 14.5 टक्के सेवाशुल्क रु. 30.00 लक्ष धरुन रु. 236.91 लक्षाची निम्नतम निविदेला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 461</u>:– प्रभाग क्र. 46 नंदनवन, रमणा मारोती, चिटणीसनगर व धन्वंतरी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. फोनिक्स इंजिनिअरींग यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.50 टक्के अधिक दराची रु. 30,44,167/– रकमेच्या निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

कामाचा खर्च प्रत प्रभाग 30.00 लक्ष पर्यंत सिमीत ठेवण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 462</u>:– प्रभाग क्र. 28 अ अंतर्गत मोमिनपुरा मध्ये डोबीनगर, भानखेडा भागातील कलकत्ता नाल्याला भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 34,99,172/– रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 618 व नवीन पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 463</u>:– प्रभाग क्र. 41 ब महाल मध्ये मॉडेल मिल बंद गेटसमोरील श्री. रंभाड यांचे घरापासून ते डॉ. आंबेडकर वाचनालयापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 29,99,691/– रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 464</u>:– प्रभाग क्र. 72 क अंतर्गत जयताळा येथील रस्त्याचे डांबरीकरण व सिमेंट फ्लोरिंगचे कामास्तव तयार केलेल्या रु. 39,89,291/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. A42001374602 (खेडे विभागाची अन्य सुधारणा) अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 465</u>:– प्रभाग क्र. 28 अ मोमिनपुरा भानखेडा परिसर आणि अंसार नगर परिसर येथे सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 49,26,690/– रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 466</u>:– प्रभाग क्र. 45, वाठोडा ते खरबी पांधन रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 29,94,159/– रकमेच्या

प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच पद क्र. A22001330802 अंतर्गत या कामास्तव तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 467</u>:— प्रभाग क्र. 68 ब अंतर्गत नरेंद्रनगर नाल्याची विविध ठिकाणी भिंत बांधकामास्तव तयार केलेल्या रु. 40,72,235/— रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 618 व नवीन पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 468</u>:— प्रभाग क्र. 45—ब, शक्तीमाता नगर येथे सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव रु. 30,82,283/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच पद क्र. A22001330802 अंतर्गत या कामास्तव तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 469</u>:— प्रभाग क्र. 20 अ आणि ब येथील भीमरत्न नगर आणि लष्करीबाग येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त 4 निविदा पैकी मे. ओ.जी.बजाज यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 3.25 प्रतिशतने अधिक दराची रु. 30,97,355/— रकमेची सुधारित निविदा, कामाचा खर्च मूळ प्राकलनीय राशी रु. 29,99,860/— पर्यंत सिमीत राहिल. या अटीवर स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 470</u>:— प्रभाग क्र. 71 (अ,ब) अंतर्गत टाकळी सिम येथे भांगे विहार, यशोदानगर व इतर ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय राशी रु. 29,99,975/— च्या दरापेक्षा 2.8 प्रतिशतने अधिक दराची रु. 30,83,974/— रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 471</u>:— प्रभाग क्र. 39 ब ढिवरपुरा, तेलीपुरा, नवाबपुरा, गरुडखांब येथे सिमेंट काँक्रीट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 29,99,262/— रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 472</u>:— मा. उच्च न्यायालयातील जनहीत याचिका क्र. 98/2011 मधील निर्देशानुसार नागपूर शहरात महिलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे.

मा. उच्च न्यायालयातील जनहीत याचिका क्र. 98/2011 मधील निर्देशानुसार नागपूर शहरात महिलांकरिता सार्वजनिक ठिकाणी, बाजारपेठा व इतर गर्दीच्या ठिकाणे अशा स्थळांवर स्वच्छता गृह उभारण्याच्या योजनेत सहभागी होण्याची इच्छा प्रदर्शीत करून ''रोटरी क्लब, नागपूर ईशान्य'' यांनी काही सवलतींच्या प्रथम टप्प्यातील उर्वरित 64 जागांवर त्यांच्या खर्चाने महिला स्वच्छतागृहे उभारण्याबाबत दि. 03.10.2015 रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे. मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. 98/2011 मधील निर्देशानुसार नागपूर शहरात महिलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे या पार्श्वभुमीवर उक्त प्रस्ताव विचारार्थ घेवुन खालील अटी व शर्तीवर प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न तसेच,

1) रोटरी क्लब यांच्या खर्चाने उभारण्यात येणाऱ्या स्वच्छतागृहाचे 5 वर्षा ऐवजी म.न.पा.च्या मंजुर जाहिरात धोरणानुसार 3 वर्षाकरिता त्यांच्या सहयोगी कंपनीचे ब्रॉडींग (जाहिरात) करण्याचे हक्क देणे.
2) म.न.पा. जाहिरात धोरणानुसार प्रत्येक स्वच्छतागृहावर लावावयाच्या जाहिरातीचे भुभाटक+परवाना शुल्क यांचे एकुण वार्षीक शुल्क अदमासे रू. 66000/— इतके आहे. मात्र प्रत्येक स्वच्छतागृहाच्या देखभालीचा व संचालनाचा वार्षीक खर्च अदमासे 162000/— प्रती वर्ष असुन जाहिरातीच्या शुल्कापोटी म.न.पा.स देणे असलेल्या रू. 66,000/— च्या बोज्यातुन रोटरी क्लब व सहभागी कंपनी यांना मुक्त करून पर्यायाने स्वच्छता गृहाच्या संचालन व देखभाल खर्चात म.न.पा.ने सहभाग देणे.
3) स्वच्छतागृहासंदर्भातील शासन परिपत्रक वर्ष 2001 मधील निर्देशांनुसार मुत्री निःशुल्क असणे आवश्यक आहे. तसेच शौचाकरिता म.न.पा.चा मंजुर दर रू. 4/— प्रती व्यक्ति असुन रोटरी क्लबने सुचविलेले शुल्क रू. 5/— प्रती व्यक्ति, वाढीव वाटत असले तरी सुटया नाण्यांच्या उपलब्धते अभावी वापर करणाराची होणारी अडचण टाळण्यास अनुकुल असल्यामुळे त्यास मान्यता देणे.
4) स्वच्छतागृहामध्ये पाणी मिटर व विजेचे मिटर म.न.पा.चे नावे बसविण्यात येईल मात्र याकरिता करावयाची आवश्यक प्रक्रिया ''रोटरी क्लब'' रितसर पुर्ण करेल. तसेच विजेचे व पाण्याचे नियमीत देयक रोटरी क्लबने मान्य केल्याप्रमाणे 'रोटरी क्लब' द्वारा संबंधीत संस्थांना अदा केले जाईल.
5) उक्त महिला स्वच्छतागृहे, उच्च न्यायालयाच्या याचिका 98/2011 मधील आदेशाचे अनुपालनाअंतर्गत उभारण्यात येत असल्यामुळे या स्वच्छतागृहांचे संचालन, महिलांकरिता कार्य करणाऱ्या संस्थांच्या सहभागाने करणे. तसेच त्यांचे संचालन व देखभाल कार्य यावर देखरेख ठेवणाऱ्या झोन स्तरावरील सनियंत्रण समितीच्या दिशा निर्देशांनुसार करणे गरजेचे राहील.
6) स्वच्छतेमधील त्रृटींच्या संदर्भात म.न.पा. स्वास्थ्य विभागाद्वारा त्यांच्या नियमांनुसार आणी संनियंत्रण समितीच्या निर्देशानुसार कारवाईस पात्र राहिल.
7) उपरोक्त अटी शर्तीवर 'रोटरी क्लब' नागपूर ईशान्य या संस्थेस त्यांनी मागणी केलेल्या एकुण 50 स्थळांऐवजी प्रथम टप्प्यात 25 स्थळे मंजुर करण्यात येवुन संलग्न यादीपैकी सोयीस्कर अशा 5 स्थळांवर प्रायोगीक तत्वांवर स्वच्छतागृहे उभारण्यास व त्यांचे पुढील 3 वर्षाकरिता संचालन आणि देखभाल करण्यास, तसेच या 5 स्थळांवरील काम पुर्ण झाल्यानंतर उर्वरित 20 स्थळांपैकी 5–5

स्थळांच्या 4 टप्प्यांमध्ये सुयोग्य स्थळांची प्राथम्यानुसार निवड करून संस्थेस उपलब्ध करून देण्यात येईल.

8) मंजुर म.न.पा. जाहीरात धोरणानुसार 3 वर्षानंतर पुढील देय विहीत मुदतवाढ, संस्थेच्या समाधानकारक कामाच्या अधिन राहील.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 473:— महानगरपालिकेतील विविध विभागप्रमुख, सहा. आयुक्त /वार्ड अधिकारी तसेच मा. पदाधिका—यांना कार्यालयीन कामाकरिता चार चाकी (Taxi permit, Tata Indica, Tata Indigo, Maruti Van & Auto Rickshaw with Loud speaker) भाडेतत्वावरील खाजगी वाहन वापरण्यासाठी सन 2015—16 व 2016—17 या दोन वर्षाकरीता वाहनाचे दर निश्चित करण्यास्तव उपरोक्त प्रस्ताव स्थायी समितीकडे मंजूरी करीता पाठविण्यात आले होते.

परंतू स्थायी समिती ठराव क्र. 119 दिनांक 16.07.2015 स्थायी समिती ठराव क्र. 165 दिनांक 31.12.2012 प्रमाणे ज्या कंत्राटास मंजूरी प्रदान करण्यात आली होती. त्याच जुन्या दराप्रमाणे (दिनांक 06.01.2015 ते 06.01.2016) एक वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आली. तसेच कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावाचे निविदा मंजूरी व पदाधिकारी व अधिका—यांना स्वतःचे वाहन वापरण्याचे दोन वेगवेगळे प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीकरीता स्वतंत्रपणे पाठविण्यात यावे असे नमूद आहे.

त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. 381 दिनांक 15.12.2014 अन्वये सन 2015—16 व 2016—17 या दोन वर्षाकरीता भाडेतत्वावर दर निश्चितीसाठी निविदा प्रक्रिया करण्यास्तव प्रशासकिय मंजूरी देण्यात आली असता, निविदा प्रक्रिया करण्यात आली असून खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क. | वाहनाचा प्रकार | अस्तित्वात असलेले निवीदा दर प्रति माह | निवीदेतील आर्थीक दर पत्रकात भरलेले दर प्रति माह | प्रत्यक्ष वाटाघाटीनुसार सुधारीत दर प्रति माह (1500 किमी) |
|---|---|---|---|---|
| 1 | मारोती व्हॅन | **15840/—** | 19900/— | **18000/—** |
| 2 | टाटा इंडिका | **19800/—** | 29900/— | **24000/—** |
| 3 | टाटा इंडिगो | **19800/—** | 35251/— | **28000/—** |
| 4 | ऑटो रिक्षा | **21600/—** | 24000/— | **23000/—** |

**अतिरिक्त तास व अतिरिक्त किमी चे दर**

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | अस्तित्वात असलेले दर | | प्रत्यक्ष वाटाघाटीनंतरचे दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | अति. किमी | अति. तास | अति. किमी | अति. तास |
| 1 | मारोती व्हॅन | 6/— | 45/— | **8/—** | **85/—** |
| 2 | टाटा इंडिका | 7/— | 50/— | **10/—** | **100/—** |
| 3 | टाटा इंडिगो | 8/— | 60/— | **13/—** | **110/—** |

सन 2015—16 व 2016—17 या दोन वर्षाकरिता उपरोक्त प्रमाणे वाहनाचे प्राप्त मासीक दर तसेच अतिरीक्त तास व अतिरीक्त कि.मी. चे दर निश्चित करून त्या नुसार कार्यादेश देण्याचे प्रस्तावीत आहे व मा. स्थायी समितीची मान्यता होवून कार्यादेश होईपर्यंत अस्तित्वात असलेल्या जुन्या दरानुसार मुदतवाढ व उपरोक्त

प्रमाणे दर निश्चीती करून कार्यादेश देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

उपरोक्त खर्च अर्थसंकल्पाच्या व्यय पद क्र. 42 (A2010021805) मधुन करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 474</u>:— प्रभाग क्र. 42 अ आणि ब महाल येथे श्री. पवार ते निंबाळकर व नागपूरे ते तुळशीबाग आणि श्री. देव ते मते चौक पर्यंत सिमेंट काँक्रीट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त 14 निविदांपैकी मे. संतोष आर. खरपकर यांची प्राकलनीय दरांपेक्षा 1.5 प्रतिशत ते कमी दराची रु. 29,54,714/— (अक्षरी एकोणतीस लक्ष चौपण्ण हजार सातशे चौदा रुपये) रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 475</u>:— प्रभाग क्र. 33—अ व ब मधील मिनीमातानगर व डिप्टी सिंग्नल मध्ये सिंमेट कॉक्रिट रस्ते बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे.जी.बी. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.2 टक्के कमी रु. 29,63,868/— रकमेची निविदा मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाचा खर्च वर्ष 2015—16 मधील पद क्र. ए 2200 1330 803 फिक्स प्रायरीटी मधुन करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 476</u>:— प्रभाग क्र. 18 (ब) अंतर्गत नाईक वाडी, बांग्लादेश बाहुली विहीर रोड व माहुरकर पेंटर अप्रोच रोडला सिमेंट काँक्रीट रस्त्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.बी.यादव यांची वाटाघाटी नंतर मूळ प्राकलनीय राशी रु. 49,89,886/— पेक्षा वाटाघाटी नंतर 1.56 टक्के कमी दराची रु. 49,12,043/— ची निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 477</u>:— प्रभाग क्र. 33 मधील डिप्टी सिग्नल जलकुंभा समोरील (मौजा चिखली देवस्थान) सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकामाकरिता प्राप्त निम्नतम निविदाकार मे. आर.एम.दयारामानी यांची प्राकलनीय दराऐवजी रु. 48,24,304/— रकमेची निविदा स्विकारण्यास्तव व सदर कामाकरिता पद क्र. A22001330802 मधून रु. 48,24,304/— राशीची तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 478</u>:— प्रभाग क्र. 22 अ ब मध्ये साळवे चौक ते नायडू चौक, गांधी चौक, धोबीपुरा भागामध्ये डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस.के.गुरुबक्षाणी यांची निविदा मूळ प्राकलनीय

दरापेक्षा 3.99 टक्के अधिक दराची रु. 31,19,230/– दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 479ः– प्रभाग क्र. 26 येथील मोरभवन सिटी बस स्टॉप परिसरात डांबरीकरण व रुंदीकरणाचे कामास्तव रु. 72,98,170/– प्राकलनास नवीन पद क्रमांक A2001370406 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 480ः– प्रभाग क्र. 17 अ अंतर्गत राऊत चौक ते दलालपुरा चौक, गुजरी चौक ते बाहुली विहिर चकना चौक व बस्तरवारी शालीग्राम चौक ते स्विपर कॉलनी येथे भुमिगत नाली टाकण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 49,99,420/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 619 (A43901371913) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 481ः– प्रभाग क्र. 72 (अ, ब, क) अंतर्गत प्रभाग विमानतळ येथील विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. पी.एम.ए. कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा राशी रू. 44,99,224/– च्या दरापेक्षा 3.5 प्रतिशतने अधिक दराची रू. 46,56,697/– रकमेची सुधारी निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 482ः– प्रभाग क्र. 37 – अ हिवरीनगर येथे वैष्णोदेवी चौक ते माधव किराणा स्टोर्स पर्यंत रस्त्याचे पुनःडाबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 49,47,344/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 483ः– नागपूर शहर मंजुर विकास आराखडयानुसार सी.ए.रोड गीतांजली चौक ते गणेश चौक ते गांधीसागर पर्यंत 18 मिटर रुंदीचा रस्ता विकसित करण्याकरिता रु. 13,73,14,400/– चे ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A42001370406 अंतर्गत खर्चाची तरतूद मुक्त करण्याचा प्रश्नासह खालील बाबतीत मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

1. उपरोक्त रस्त्याबाबत मा. आयुक्त यांचे दि. 04.01.2013 च्या आदेशान्वये निविदा द्वारे मे. ॲक्झीनो कॅपिटल सर्व्हिसेस यांना उपरोक्त रस्त्याकरिता रु. 4,75,000/– चा कार्यादेश क्र. 16914 दि. 31.10.2013 अन्वये प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता निविदाद्वारे नेमले होते.
2. संबंधित रस्त्याची मोजणी नगर भुमापन अधिकारी क्र. 1 नागपूर यांचेकडून रु. 2,18,000/– मोजणी फी दि. 27.02.2015 ला भरुन संयुक्त मोजणी

करुन घेतली.

3. संयुक्त मोजणीच्या आधारे एकूण 68 बाधित मालमत्ता येत असून त्यापैकी 11 मालमत्ता महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जागेवरील आहेत व 21 मालमत्ता नगरभूमापना मध्ये नोंदणीकृत नाहीत. परंतु त्यापैकी काही मालमत्ता धारकांना मनपा स्लम विभागाद्वारे फोटोपास दिलेल्या आहेत.
4. महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या मालमत्ता मनपाला विनामूल्य हस्तांतरीत करण्याकरिता मा. जिल्हाधिकारी नागपूर यांना पत्र क्र. 80/CQC LAB - का.अ.(लो)/2015 दि. 10.05.2015 अन्वये विनंती करण्यात आली.
5. संपूर्ण रस्ता घोषित स्लम वसाहती मधून असल्याने पात्र बाधित घरमालकांना/इमला मालकांना पुनःर्स्थापित करण्याबाबत एस.आर.ए. विभागाला दि. 04.08.2015 ला कळविले असता फेर तपासणी करीता कार्यकारी अभियंता (स्लम) यांचेकडून गांधीबाग झोन क्र. 6 ला दि. 24.08. 2015 ला परत करण्यात आली आहे.
6. उपरोक्त एकूण 13.73 कोटीच्या प्रस्तावामध्ये (अ) रस्त्याकरिता 2.42 कोटी (ब) सि.डी. वर्क्सकरीता 1.81 कोटी (क) युटीलीटी शिफ्टींग करण्याकरिता तसेच भुअर्जन करीता रु. 9.00 कोटी (ड) 0.50 कोटी कॉन्टीजन्सीज क्वालीटी कंट्रोल व देखभालीसह प्रशासकीय खर्चाचा समावेश आहे.
7. प्रशासकीय मान्यतेप्रमाणे, शासनाचे मालकीची जागा मनपास विनामूल्य मिळाल्यास व आवश्यक प्रावधान उपलब्ध झाल्यास निविदाद्वारे पी.एम.सी. ची नेमणूक करण्यात येईल. त्याचप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

अध्यक्ष :— अपर आयुक्त महोदया, आम्ही दोन महिन्यापुर्वी एक नोटस् पाठविली होती, त्या नोटस् मध्ये नागपूर महानगरपालिकेच्या जेवढया काही नस्ती पुर्वी पासुन जमा असेल त्यामध्ये प्रशासकीय मान्यता, फिक्स प्रायरिटीच्या संदर्भातील नोटस् असतील त्या काही महिन्यापुर्वी प्रमुख लेखा व वित्त अधिकारी साहेबाकडे होती त्यानंतर आमच्याकडे कोणतीच नस्ती नाही यावरुन आमच्या असे निर्देशनास आले की, अनेक वर्कऑर्डर, टेण्डर बाकी राहिलेले आहे आणि ते परंपरा नुसार चालु आहे. आम्हाला असे म्हणायचे आहे की खेळीमेळीच्या वातावरणात आम्ही प्रशासनासोबत राहीलो चांगले सहकार्य केले आणि मग 2 ते 3 महिन्यात प्रशासनाने आपली चाल बदलवू नये अशी माझी विनंती आहे. तसेच स्थायी समितीच्या सदस्याचे काम झाले पाहिजे, शहराच्या विकासासाठी निधी देवून त्यांच्या फाईलवर पॉझीटीव्ह लक्ष देण्यात यावे.

श्री. किशोर डोरले :— मा. सभापती महोदय, आपण कर प्रणाली मध्ये जो काही बदल केला आहे, सभागृहामध्ये जे दर ठरविले ते या वर्षापासुन लागु होणार आहे काय ?

श्री. दांडेगावकर (अति. उपायुक्त) :– मा. सभापती महोदय, आपण जे धोरण सभागृहामध्ये मार्च महिन्यामध्ये ठरविले होते त्यानुसार आपल्याला या वर्षापासुन लागु करण्याचे आमचे उद्धिष्ट आहे सद्यस्थितीत आपण गेल्या वर्षाचे सर्व्हे, सभागृहाचे उद्धिष्ट त्या नुसार वाढीव टॅक्स आकारण्याचे धोरण आहे त्यानुसार या वर्षापासुन सभागृहामध्ये जे दर ठरविले आहे ते लागु करण्यात येईल.

श्री. किशोर डोरले :– मा. सभापती महोदय, जे नविन दर या वर्षापासुन लागु करणार आहे तर त्या संदर्भात कामाची काय पध्दत राहील या संदर्भात माहिती दयावी.

श्री. दांडेगावकर (अति. उपायुक्त) :– मा. सभापती महोदय, या संदर्भात आपण घरोघरी जावुन प्रत्येक मालमत्तांचे सुमारे साडेपाच ते सहा लक्ष मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी आपण एक एजन्सी नियुक्त केली आहे त्यानुसार एजन्सी डेमो झोन मध्ये घरोघरी जावुन काम करीत आहे. त्यांना 18 महिन्यांचा कालावधी देण्यात येईल 18 महिन्याच्या कालावधी मध्ये साधारणतः साडेपाच लक्ष घरांचे सर्वेक्षण करण्यात येईल.

श्री किशोर डोरले :– मा. सभापती महोदय, ज्या वेळेस आपण नविन कर प्रणाली सभागृहामध्ये घोषित केली व ती कर प्रणाली लागु झाली परंतु जी नविन कर प्रणाली आपण राबविली आहे ती पुढच्या वर्षी मार्च पासुन आपण लागु करु शकलो असतो, आज ज्या परिस्थीतीमध्ये महानगरपालिकेला टॅक्स यायला पाहिजे तो साधारणतः 300 कोटीच्या जवळपास येईल त्यापेक्षा जास्त कर या वर्षी येणार नाही कारण असे आहे की, या वर्षी 5 ते 6 कर्मचारी ट्रॅप मध्ये पकडले गेले. नुसता पैशाचा खेळ चालला आहे कर्मचाऱ्यांची काम करण्याची इच्छा नाही जर या वर्षी जुनी टॅक्सची पध्दत राबविली असती तर 700 ते 800 कोटी रुपये महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये आले असते. जी नविन कर प्रणाली आपण राबवित आहे त्या नुसार आपले काम सुरु व्हायला पाहिजे ते केव्हा सुरु होणार आहे ? आपण टॅक्स कुठल्या पध्दतीनुसार घेणार नविन कर प्रणाली नुसार की जुन्या कर प्रणालीनुसार हे स्पष्ट व्हायला पाहिजे. सहा. आयुक्त श्री. मेश्राम साहेबांनी सांगितले की, एका बॅकेकडुन 26 लक्ष रुपयांची वसुली येत होती परंतु त्यांच्याकडुन फक्त 2 लक्ष 40 हजार रुपये येत आहे. ते हुशार माणसे आहे त्यांनी आपली नस पकडली त्यांनी कायद्याचा आधार घेतला यामध्ये साडेतेवीस लक्ष रुपये माफ झाले तर नागपूर शहरामध्ये अशा पध्दतीचे आणखी किती टॅक्स माफ होईल. सभागृहामध्ये जेव्हा हा विषय पाठविला तेव्हा सांगायला पाहिजे होते आज मंजुर केला तर पुढच्या वर्षी आपण ही नविन कर

प्रणाली राबवायला पाहिजे त्यामुळे या वर्षीच्या टॅक्सची परिस्थिती सुधारली असती. आणखी 300 ते 350 कोटी रुपये महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये जमा झाले असते. बॅकेच्या उदाहरणामध्ये 24 लक्ष रुपयांचे नुकसान एका प्रॉपट्रीमध्ये झाले या वर्षी टॅक्स किती येईल या संदर्भात अजुनपर्यत सर्व्हे झाला नाही म्हणुन आपण टॅक्स घेवु शकत नाही. मग आपण टॅक्स कोणत्या पध्दतीने घेणार आहे अशी महानगरपालिकेची परिस्थीती झाली आहे.

सभापती :— शहराच्या विकासासाठी शासनाने मदत दिली म्हणुन काहीच करायचे नाही. शासनाने जर पैसे दिले नसते तर तुम्ही आम्हाला काहीच करु दिले नसते. महानगरपालिकेने दिलेले उद्यीष्टे हे अर्ध्यावर सुध्दा प्राप्त होत नाही या संदर्भात जबाबदारी कोणाची राहील? पुढच्या सभेमध्ये या संदर्भातील पुर्ण सविस्तर माहिती देण्यात यावी.

<u>ठराव क्रमांक 484</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर